# विद्यापीठातर्फे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने एम.एस्सी. व अन्य अभ्यासक्रमाच्या नाव नोंदणी करण्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया राबविली जात आहे. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

कोरोनाचा संसर्ग वाढल्याने अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याची भूमिका राज्य सरकारने जाहीर केली आहे. याचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. परंतु, विद्यापीठाने एम.एस्सी. व इतर अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे.. ही केवळ नोंदणी असून प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया विद्यार्थ्यांना गुणपत्रक मिळाल्यानंतर केली जाणार असल्याचे विद्यापीठातील अधिकाऱ्याने सांगितले.

# छायाकल्प चंद्रग्रहण खगोलप्रेमींसाठी पर्वणीच

## सोशल मीडियावरही चंद्रग्रहणाची धूम : तीन तासांहून अधिक काळ होते ग्रहण

प्रतिनिधी
कोल्हापूर

वर्षातील दुसरे छायाकल्प चंद्रग्रहणाचा अवकाशातील खेळ पाहण्यासाठी शुक्रवारी सव्वा अकरा ते पहाटे दोन वाजेपर्यंत खगोल प्रेमींनी दुर्बिनी रोखल्या होत्या. अधूनमधून येणारे ढग या वातावरणात छायकल्प चंद्रग्रहण शुक्रवारी कोल्हापूरकरांनी अनुभवले.

छायाकल्प चंद्रग्रहणाला शुक्रवारी रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी सुरवात झाली. यानंतर ते सहा जूनच्या पहाटे २ वाजून ३४ मिनिटांनी हे ग्रहण संपले. या ग्रहणाचा कालावधी ३ तास १५ मिनिटे आणि ४७ सेकंद इतका होता. या छायाकल्प ग्रहणाचा मध्य रात्री १२ वाजुन ५४ मिनिटांनी होता आणि चंद्राचा ५७ टक्के भाग पृथ्वीच्या उपछायेतून छायाकल्प गेल्याने तो तांबूस रंगाचा दिसत होता. पहाटे



२ वाजून ३४ मिनिटांनी ग्रहण संपले. खगोलप्रेमींसह सर्वसामान्य नागरिकांनी आपआपल्या घराच्या छतावरून चंद्रग्रहण पाहण्याचा आनंद घेतला. यंदाच्या वर्षात पुढील महिन्यात ५ जुलै रोजी चंद्रग्रहण दिसणार आहे पण हे ग्रहण सकाळी असल्याने याचा लाभ घेता येणार नाही.

या छायाकल्प ग्रहणामध्ये पृथ्वी सूर्य आणि चंद्राच्यामध्ये येते. तेंव्हा पृथ्वी ही चंद्रावरती पडणारी सूर्यकिरणे अडवते. यावेळी चंद्रावर पृथ्वीची सावली पडते. याला चंद्रग्रहण असे म्हणतात. हे ग्रहण छायाकल्प प्रकारचे असल्याने चंद्र पृथ्वीच्या बाह्य सावलीतून गेला.

### छायाकल्प चंद्रग्रहणात चंद्र हा पृथ्वीच्या उपछायेतून जातो

वर्षातील दोन चंद्रग्रहण छायाकल्प प्रकारातील होते. चंद्र पृथ्वीच्या उपछायेतून जात असल्यामुळे चंद्रग्रहण सुरू झाल्याचे सर्वसामान्यांना समजपणे समजत नाही. ग्रहण सुरू होण्यापुर्वीची आणि ग्रहण लागल्यानंतरच्या चंद्राच्या प्रकाशाच्या तिव्रतेवरून ग्रहण ओळखता येते. अशा प्रकारच्या ग्रहणामध्ये चंद्राच्या प्रकाशाची तेजस्विता ५० टक्केपेक्षा कमी असते. खग्रास आणि खंडग्रास चंद्रग्रहणामध्ये चंद्र पृथ्वीच्या मुख्य छायेतून जात असल्यामुळे तो गडद तांबूस रंगाचा दिसते.

**डॉ. राजीव व्हटकर**
**(शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधनकेंद्राचे समन्वयक )**

### पुढील वर्षी ग्रहण पहायला मिळणार

शुक्रवारी भारतात चंद्रग्रहण झाले. आता २१ जूनला सूर्यग्रहण, ५ जुलैला चंद्रग्रहण, ३० नोव्हेंबर व १४ डिसेंबरमध्ये ग्रहणे होणार आहेत पण यातील काही ग्रहणे भारतात दिसणार नाहीत. यामुळे पुढच्या वर्षी जूनमध्येच भारतात ग्रहण दिसेल.

**डॉ. मिलींद कारंजकर (पदार्थविज्ञान व खगोलशास्त्र विभागप्रमुख, विवेकानंद कॉलेज)**

Sun, 07 June 2020
https://epaper.tarunbharat.com/c/52573834

# विद्यापीठातील प्रशासकीय कार्यालये उद्यापासून सुरू

## कुलसचिवांचे अधिविभागप्रमुख, प्राचार्यांना परिपत्रक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय कार्यालये व अधिविभागात आवश्यकतेनुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून ८ जूनपासून कामकाज सुरू होणार आहे. याबाबतचे परिपत्रक कुलसचिवांनी अधिविभागप्रमुख, प्राचार्यांना काढले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार, जिल्हाधिकाऱ्यांकडून सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करण्यात आली आहेत. या अनुषंगाने विद्यापीठातील अधिविभाग, प्रशासकीय विभाग, संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य, संचालक यांच्या प्रशासकीय कामकाजाकरिता विद्यापीठाकडून परिपत्रक काढण्यात आले आहे.

अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभाग वगळता इतर प्रत्येक विभागप्रमुखांनी विभागातील शिक्षकेतर, अधिकारी व सेवकांपैकी




१५ टक्के याप्रमाणे अधिकारी व सेवकांना रोटेशननुसार कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज करून घ्यावे. ज्या कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळाली आहे, त्यांनी घरी राहून कार्यालयीन काम करावे. विभागातील प्रत्येक अधिकारी, सेवक आठवड्यातील एक दिवस कार्यालयात उपस्थित राहतील, याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

महाविद्यालयातील विद्यापीठातील जे अधिकारी कर्मचारी मुख्यालय सोडून बाहेर गावी आहेत. त्यांनी राज्य शासन व जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून मुख्यालयाच्या ठिकाणी पोहोचण्याबाबत कार्यवाही करावी. विभागप्रमुखांनी उपस्थित अधिकारी, सेवकांची उपस्थिती दिवस व कामाचे स्वरूप यांच्या नोंदी ठेवाव्यात. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारी सुरक्षा विभाग, आरोग्य विभाग व अभियांत्रिकी अंतर्गत असलेली

> प्रतिबंधित क्षेत्रात निवास असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कार्यालयीन कामकाजाकरिता बोलावू नये. त्यांना घरी राहून काम करण्याबाबत सूचना द्याव्यात. मात्र, अशा सेवकांनी विभाग प्रमुख यांच्याकडे ई-मेलद्वारे कळवावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

कार्यालये पूर्ण क्षमतेने कार्यरत राहणार आहेत, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

